C:\Steno\Complents.doc

## मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचे कार्यालय.

कार्यालय-शासकिय मुद्रणालयाजवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर
फोन- ०७१२-२५६०९५३. फॅक्स - २५५२५१८, ई-मेल- ccfwingp@sancharnet.in

क्रमांक : कक्ष-१(अ)/लले/तक्रार/ ९८८
नागपूर-४४०००१, दिनांक ८/२/१०

प्रति,
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय :- ताडोबा राष्ट्रीय उद्यानाजवळ बांधण्यात यैणाऱ्या पर्यटक संकुलाबाबत तक्रार.**

संदर्भ :- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक/प्रमुवसं/स्विस/३६४५, दिनांक ०१ फेब्रुवारी,२०१०

उपरोक्त संदर्भान्वये प्राप्त झालेल्या मा.आ.श्री सुधीर मुनगंटीवार, विधानसभा सदस्य यांच्या पत्रातील नमुद मुद्यांबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

व्याघ्र आरक्षीत क्षेत्रातील गाभ्याचे (Core) क्षेत्र व्यवधान मुक्त ठेवणे, प्रामुख्याने पर्यटकांच्या हालचाली पासून होणाऱ्या व्यधाना पासून मुक्त ठेवणे आवश्यक असल्याने राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक १४ जून, २००७ रोजी बोरीवली येथे मा. मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या निर्णया प्रमाणे आपले आदेश क्रमांक कक्ष-२३(२)/सर्वे/प्र.क्र./६८३६, दिनांक १२.०२.२००८ अन्वये दिनांक ०१.०४.२००८ पासून ताडोबा येथील विश्रामगृह व उपहारगृहासह या सह सर्व पर्यटन सुविधा बंद करण्यात आले आहे. सदर आदेशात व्याघ्र आरक्षित क्षेत्रामध्ये थांबण्याऱ्या पर्यटकांना कोळसा आणि मोहर्ली येथे सामावून घेण्यात यावे, असे ही नमूद आहे. कोळसा येथे सहा कक्ष असलेले वनविश्रामगृह व मोहर्ली येथे प्रादेशिक वन विभागाकडे असलेले दोन कक्षाचे वनविश्रामगृह आहे. त्या व्यतिरिक्त मोहर्ली येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे ही resort आहे.

या व्यतिरिक्त निसर्ग पर्यटन अंतर्गत कोळसा, पांगडी व मोहर्ली येथे पर्यटकांसाठी निसर्ग पर्यटन योजने अंतर्गत सुविधा विकसीत करण्यात येत आहेत. त्यासाठी शासनाकडून प्राप्त अनुदानाप्रमाणे कामे करण्यात येत आहेत. सदर कामे वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांच्या कडून करण्यात येत आहे. सदर कामे कोणत्या संस्थेस द्यावी या बाबत या कार्यालयातर्फे कोणत्याही सुचना देण्यात आलेल्या नाहीत. या तिन्ही ठिकाणी काही कामे वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा यांच्या तर्फे ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र दत्तपूर, वर्धा यांना देण्यात आले आहे. त्याबाबत ही या कार्यालयाकडून सूचना देण्यात आल्या नाही. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांनी सदर संस्थेला दिलेल्या कामाबाबतच्या तपशिलाबाबत त्यांचे पत्र क्रमांक/कक्ष-(१)/खर्च/२१८ दिनांक १६.०९.२००९ अन्वये कळविले आहे. (छायांकित प्रत सोबत जोडली आहे) सदर पत्रात त्यांनी या संस्थेस काम देतांना काही उणिवा असल्याचे नमुद केले असून सर्व कागदपत्राची पुर्तता करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे नमुद केले होते. सदर पत्र लिहीण्यापुर्वी त्यांच्या दैनंदिनीत त्यांनी ग्रामपयोगी विज्ञान

08 FEB 2010

C:\Steno\Complents.doc

केंद्र, दत्तपूर, वर्धा येथे दिनांक ११.०९.२००९ रोजी भेट दिल्याचे नमुद आहे. परंतु त्यांच्याशी काय चर्चा केली, याबाबत तपशील नाही. त्यानंतर वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा यांनी त्यांचे पत्र क्रमांक/कक्ष-(१)/खर्च/४८३, दिनांक १५.१०.२००९ अन्वये ग्रामपयोगी विज्ञान केंद्र दत्तपूर, वर्धा यांनी काही महत्वाच्या बाबी पुर्ण करण्याचे टाळले असल्याचे नमूद करुन त्यांच्या कडून वसुल करावयाच्या रक्कमेबाबत निर्देश देण्याबाबत या कार्यालयास कळविले. त्याच प्रमाणे त्यांनी केलेल्या कामाच्या मोजमापाची तपासणी करण्याकरीता या कार्यालयातील उप वनअभियंता यांना पाठविण्याकरीता विनंती केली होती. (छायांकित प्रत सोबत जोडली आहे) त्यावर या कार्यालयाचे पत्र क्रमांक/कक्ष-३(क)/योजना/१०००, दिनांक ०४.११.२००९ (छायांकित प्रत सोबत जोडली आहे) अन्वये कळविण्यात आले होते की, सदर कामे वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा यांचे स्तरावर देण्यात आले असून MOU प्रमाणे कार्यवाही करणे त्यांच्या कडून अपेक्षित आहे. त्याच प्रमाणे मोजमापाचे काम त्यांच्या अधीनस्थ कर्मचाऱ्याकडून करण्यात यावे व काही बाबींबाबत या कार्यालयाकडून कार्यवाही अपेक्षित असेल तर त्या प्रमाणे प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तथापी त्यानंतर त्यांच्या कडून सदर कामाबाबत कोणताही अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे आपल्या संदर्भिय पत्रान्वये विचारलेल्या बाबींबाबत त्यांचे कडून अहवाल मागविण्यात येत आहे. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांच्या कडून अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवण्यात येत आहे.

सहपत्र - वरील प्रमाणे.

मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
नागपूर

प्रतिलिपी - संदर्भिय पत्राचे छायांकित प्रतीसह वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता अग्रेषित. त्यांनी या संदर्भात त्यांच्या तर्फे करण्यात आलेली कार्यवाही, बांधकामाची सद्य:स्थिती तसेच सदर संस्थेबाबतच्या माहिती बाबत अहवाल सादर करावा.